# स्वातंत्र्य चळवळीतील क्रांतीवीरांगना: इंदुताई पाटणकर

**कु. नम्रता देविदास ढाळे**
सहाय्यक प्राध्यापक,
इतिहास विभाग,
विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, (स्वायत्त)
namuddhale@gmail.com

**प्रस्तावना-**

भारतीय समाज व्यवस्थेने दीर्घकाळ स्त्रियांना दुय्यम दर्जाची वागणूक दिली. धर्म, संस्कृती, संपत्ती, राजकारण अशा जीवनाच्या सर्व क्षेत्रात स्त्रियांचे अधिकार नाकारले. विधवा विवाह बंदी. बालविवाह. स्त्रियांचा पुनर्विवाह नकार. पुरुषांच्या बहुपत्नीत्वास मान्यता. लैंगिक अत्याचार. बलात्कार, मारहाण, खून, जरठ कुमारी विवाह, हुंडा पद्धती, सती, स्त्रियांना व्यवसायाला भाग पाडणे, रखेल, वेठबिगारी, चारित्र्यावर शिंतोडे उडवणे, संशय घेणे. अशा विविध पद्धतीने स्त्रियांवर भारतीय समाजाने अन्याय केले.

जगातल्या पुढारलेल्या विज्ञाननिष्ठ मानल्या गेलेल्या समाजामध्ये देखील स्त्रियांना कमी जास्त प्रमाणात विषमतेची वागणूक मिळाली आहे. जगातल्या १४ प्रमुख धर्मांनी पुरुषप्रधानतेला स्थान दिले आहे. मध्ययुगापासून सरंजामी भांडवली समाज व्यवस्थेमध्ये स्त्रियांचे शोषण झाले. शोषणाला तत्त्वज्ञानाचा आधार देण्याचा प्रयत्न झाला. आदिम साम्यवादी अवस्थेत मानवी जीवनात वर्णभेदाप्रमाणे लिंगभेदावर आधारित विषम समाजव्यवस्था ही नव्हती. काही जनविभागांमध्ये स्त्रीप्रधानता प्रभाव जाणवत होता. मातृसत्ताक समाज व्यवस्था ही होती. त्याकाळात स्त्री प्रबला होती. तत्वज्ञानाच्या क्षेत्रात आदीमतेला महत्त्व होते. स्त्री दास्य निर्माण झालेले नव्हते. स्त्रीला स्वतःला व्यक्तिमत्त्वाचा विकासाची पुरुषा इतकी संधी होती.

नाती समाज, वर्ण समाज, वर्ग समाज लिंगभेदावर आधारित तयार झाले. स्त्रियांना पुरावस्थेला प्रारंभ झाला. मणुस्मृतीच्या काळापासून स्त्री शूद्रतीशूद्र शोषणाचे शिकार बनत गेले. प्रबला असणारी स्त्री अबला बनली. व्यवस्थेने तिला तशी बनवली. नवा शोषणमुक्त समाज आणि समान संधीच्या पायावर उभा राहिलेल्या विज्ञाननिष्ठ समाजवादी समाज निर्माण करायचा असेल तर स्त्रीला सबला बनायला संधी दिली पाहिजे.

अति प्राचीन कालखंडात लढाईचे संदर्भ मिळतात. पुराण आणि इतिहासात वेगवेगळया स्त्रियांचे संदर्भ घेतले जातात. रंभा, उर्वशी, मेनका अशा अनेक स्त्रियांची नावे मिळतात. यामध्ये ब्रह्मवादीनी स्त्रियांची अनेक उदाहरणे ही सापडतात. इतिहास काळात चांदबिबी, पन्नादाई, जिजामाता अशा अनेक स्त्रियांची उदाहरणे मिळतात.

स्त्रीवादी जीवन विचार आकार घेतो आहे. १९६० पासून या स्त्री विचार चळवळीने गती घेतली. नव विचार समोर आले. समाज व्यापून टाकला. १९७५ मध्ये स्त्रीवादी विचाराचे वारे जोरात वाहू लागले. कला, साहित्य, नाटक, चित्रपटात, समीक्षा, सौंदर्यशास्त्र, राजकारण, अर्थकारण, व्यापार, समाजकारण स्त्रीवादी विचारांची मांडणी होत गेली. यानंतर मात्र जाणीवा व जागृत झालेल्या विचार, दिशा स्वीकारलेल्या स्त्रिया आणि स्त्री पुरुष समानतेचा विचार स्वीकारलेले पुरुष एकत्र येऊन चालवयाची ही चळवळ आहे. ही मानसिकता बदलण्याची चळवळ आहे. स्त्री पुरुष समानतेच्या लढ्याचे काम तुलनेने अधिक गुंतागुंतीचे व नाजूक आहे. क्रांतीवादी कलात्मक पद्धतीने हा गुंता सोडवावा लागला आहे.

भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये स्त्रियांचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. या चळवळीमधील स्त्रियांचा सहभाग विविध पातळयामधील होता. झाशीची राणी, मादाम कामा, कॅप्टन लक्ष्मी, उषा मेहता, निर्मला देशपांडे, बिळाशीच्या सत्याग्रहातील मैनाबाई साठे, गंगुबाई बाळा धनगर, काशीबाई परीट अशी असंख्य नावे समोर आली आहेत.

क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली संघटित झालेल्या प्रतिसरकारच्या चळवळीमध्ये राजूताई बिरनाळे, गंगुबाई लाड, इंदुताई पाटणकर, गुणाबाई अशा अनेक स्त्रिया होत्या. मुलगा, नवरा, भाऊ, वडील चळवळीत असल्याने आपले घर हे चळवळीचे ठाणे झाल्यामुळे, आजारी जखमी स्वातंत्र्य सैनिकांची सेवा करणे. गुप्त प्रवासात त्यांची साथ करणे. हत्यारे व लपवायला जागा देणे. लुटीचे पैसे वाहतूक करणे. बुलेटीन वाटणे. निरोप देणे. दारूगोळा लपवून ठेवणे. पोलिसांवर लक्ष ठेवणे. डोंगरदऱ्यात जाऊन जेवण पुरवणे. अशा असंख्य पद्धतीने स्त्रियांनी प्रतिसरकारच्या चळवळीत भागीदारी इंदुताईनी केली होती.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रतिसरकारच्या सशस्त्र चळवळीत आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर समाजवादी आणि साम्यवादी विचारांच्या वर्ग संघर्षांच्या चळवळीत श्रमिक मुक्ती दलाच्या नेतृत्वाखालच्या समन्वयांनी पाणी वाटपाच्या चळवळी, परित्यक्ता महिलांचे हक्क प्रस्तापनाच्या चळवळी, शेतमजूर कष्टकरी संघटनेच्या नेतृत्वाखाली कृष्णा कोरे समन्यायी पाणी वाटप, धरणग्रस्त साखर कारखाना, कामगार शेतमजूर स्त्रिया, कष्टकरी शेतकरी यांच्या विविध चळवळींच्या मध्ये सहभागी होणाऱ्या इंदुताई पाटणकर यांच्या जीवनाच्या धगधगता इतिहास आजवर चाललेल्या स्त्रीवादी संघर्षाच्या प्रकाश परवाला एक नवी झळाली प्राप्त करून देणारा व इंदुताईचा लढणाऱ्यांच्या नव्या पिढीला प्रोत्साहन देणारा इतिहास आहे.

**कि-वर्ड** - स्वातंत्र्य चळवळ

**उद्दिष्टे-**

१) इंदुताईचे योगदान अभ्यासणे.

२) इंदुताईचे सामाजिक कार्य अभ्यासणे.

३) प्रतिसरकार चळवळीतील योगदान अभ्यासणे.

४) स्त्रियांसाठी केलेल्या सुधारणा अभ्यासणे.

**इंदुताईंचे पूर्व आयुष्य-**

इंदिरा दिनकरराव निकम असे पूर्ण नाव होते. इंदुताईंचा जन्म इंदोली तालुका कराड जि. सातारा येथे १५ सप्टेंबर १९२५ रोजी झाला. वडिलांचे नाव दिनकरराव, आईचे नाव सरस्वती या जोडप्यांना १४ आपत्य होती. त्यामध्ये इंदुताई पहिल्या बाकीची सर्वजण लहान होते. इंदू, सिंधू, काशी, मंदाकिनी, अरुणा आणि भाऊ संभाजीराव इतकीच मुले जिवंत राहिली. इंदुताईंचे आजोळ कोपर्डे गाव त्यांच्यावर आजी गोदावरी यांचा खूप प्रभाव पडला. इंदुताईंचा पुरोगामी जीवनविचार आजीच्या जीवन व्यवहारा मध्ये प्रकाश घडला. ध्येयवादी क्रांतिकारी नातीला पैलूदार तेजस्विनी बनवण्याचे काम आजीने केले. गोदावरी पाटील विसाव्या शतकातील पश्चिम महाराष्ट्रातील घरंदाज मराठा घराण्यातील, स्त्रियांच्या दुर्दैवाच्या दशकावताराचे प्रतिनिधिक दर्शन मानावे लागेल. गोदावरी बाईने आपल्या स्वप्नातील आदर्श कार्यकर्ती म्हणून नातीला म्हणजेच इंदुताईला घडवायचे ठरविले. आजीने इंदुताईंना विहिरीत पोहायला, सायकल चालवायला, घोड्यावर बसायला, मैदानी खेळ, मर्दानी खेळ शिकवले, आजीच्या चौफर शिक्षणातून मार्गदर्शन आणि संस्कारातून इंदुताई क्रांतिकारी विचारांची ध्येयवादी स्त्री कार्यकर्ती आकार घेत गेली.

इंदुताईंचे वडील दिनकरराव निकम घराणे इंदोली गावातले प्रमुख प्रतिष्ठित प्रभावी घराणे. सत्यशोधक चळवळीसाठी मोठा सहभाग दिनकररावांचा होता. या उन्नतीच्या चळवळीमुळे दिनकरराव निकमांचा वि.रा. शिंदे, क्रांतीसिंह नाना पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील, कूपर रामानंद भारती अशा अनेक कार्यकर्त्यांमध्ये दिनकररावांच्या शब्दाला किंमत होती. ‘चले जाव’, ‘सायमन गो बॅक’ अशा अनेक चळवळीमध्ये भाग घेतला. अशा चळवळीमध्ये इंदूताई कार्यकर्त्यांच्या खांद्यावर बसून सभा, मोर्चामध्ये वयाच्या चार-पाच वर्षाची असताना पाहू लागल्या. घरी चाललेल्या चर्चा, खलबते, गुप्त नियोजन, अभ्यास शिबिरे शांतपणे बघत होत्या. १९४१ साली वडिलांना वैयक्तिक सत्याग्रहात अटक झाली. तेव्हा इंदुताई १६ वर्षांची झाली. घरी येणार जाणाऱ्यांचा पाहुणचार, आजारी स्वातंत्र्यसैनिकांच्या सेवेचा निरोप देणे. पत्रे, चिठ्ठ्या पाठवणे, सभा, संमेलनाचे नियोजन करणे यामध्ये ‘बाप से बेटी सवाई’ हे सिद्ध झाले.

**इंदुताईचा घरातून बाहेर पडलेले पाऊल-**

क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या चळवळी चालूच होत्या. 'खून का बदला खून से' अशा घोषणा चालू झाल्या. यावेळी इंदुताईंनी मोठी कामगिरी केली. प्रभात फेऱ्या काढणे,गाणी, सेवादलाशी संघटित करणे, सभा, परिषदा, बुलेटिन वाटणे, इंदुताई स्वतः बंदूक पिस्तूल रिवॉलव्हर हाताळत होत्या. हात बॉम्बशी खेळत होत्या. अशा क्रांतिकारी वागण्यातून समाजात त्यांच्या वडिलांना खूप बोलणी खावी लागली. व लग्नासाठी वडील ताबडतोब वर शोधत निघाले हे इंदुताईना समजताच मला कोणाच्या गळ्यात बांधतील या विचाराने इंदुताई घर सोडून निघाल्या. पुन्हा घरी न परतण्याचा निर्णय घेतला. दिनकरराव निकम या पुढारी कार्यकर्त्याची तरुण मुलगी घर सोडून बाहेर पडली ही बातमी सातारा जिल्ह्यातील चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांत पसरली. इंदोलीच्या घराबाहेर पडल्यावर पांडू मास्तरांच्या पत्नी गिताबाई पाटील यांना भेटली. गीताबाई त्यावेळेस स्वातंत्र्य चळवळीचे काम करणाऱ्या सर्वसामान्य, प्रौढ, पूर्ण वेळ स्त्री कार्यकर्त्या होत्या. इंदूताईने गीताबाईंना सांगितले, 'मी निर्धाराने वडिलांचे घर कायमचे सोडून आलेली आहे. मला लग्न, नवरा, संसार असल्या व्यक्तिगत मोह जाळ्यात रस नाही. मला स्वातंत्र्याच्या चळवळीत काम करायचं आहे. खऱ्या स्वातंत्र्याच्या शोधासाठी मला माझे आयुष्य वहायचे आहे. पूर्णवेळ जीवनदानी स्त्री कार्यकर्ती व्हायचे आहे. सखोल वाचन करायचे आहे'. इंदुताई, गिताबाई, तांबव्याच्या यशोदाबाई यांनी कासेगाव मध्ये दीडशे स्त्रियांचे २१ दिवसांचे अभ्यास शिबिर संघटित केले. इंदुताई सर्वात जास्त शिकलेली होती. गाणी, कविता, राष्ट्रगीते, क्रांतीगीते म्हणत. क्रांतीकारकांच्या गोष्टी सांगणारी, गांधीवाद, समाजवाद, मार्क्सवाद या विषया वरती पुस्तके वाचणारी, अभ्यासू विचारी नेते, तत्त्वज्ञ यांच्या बरोबरीने बसून आत्मविश्वासाने प्रगल्भतेने विषय समजून घेणारी, प्रभावी वक्तृत्व आणि व्यक्तिमत्व असणारी इंदुताई उत्तर सातारा जिल्ह्यातल्या हजारो तरुण स्त्रियांची सर्वसामान्य सखी सहकारी बनली.

**इंदुताईंचा निश्चय-**

इंदुताईंनी कासेगाव येथे सेवादलात स्त्रियांचे शिबिर गाजवलं. साताऱ्याची प्रतिसरकारची चळवळ ऐन भरायला आली होती. ठीकठिकाणी तारा तोडणे, स्टेशन जाळणे, मोर्चे, हत्यारे, रेल्वे, पोस्टमन, खजिना लुटणे या गोष्टी सुरू होत्या. दरोडेखोर आणि ब्रिटिश पोलिस यांची युती झाली होती. 'गिल्बर्ट' स्वतः साताऱ्यात पाहणी करत होता. ऑगस्ट १९४२ नंतर बंगालमधील मिदनापूरचे प्रतिसरकार उग्र आक्रमक बनले होते. क्रांतीवीरांनी अनेकांना फाशी दिली. महात्मा गांधींनी तिथे जाऊन तिथल्या प्रतिसरकारचे काम काही काळासाठी थांबवले. शिरवळ पासून जत पर्यंत दररोज साम्राज्यशाहीला आव्हान देणाऱ्या घटना घडत होत्या. सर्व क्रांतिवीरांप्रमाणे इंदुताईंना सातारा जिल्हा सोडण्याचा प्रश्न उभा राहिला. बाबूजी पाटणकर यासारख्या महत्त्वाचे क्रांतिवीर शिबिराकडे फिरू शकले नव्हते. इंदुताई मुंबईला जाऊ शकत होत्या पण त्या मुंबईला गेल्या नाहीत. एक तर घर सोडल्यापासून बहुतेक सर्व पुरुष कार्यकर्ते संशयाने पाहत होते. दुय्यम दर्जाची वागणूक देत होते. 'इंदोलीला जा आणि सेवा दलात काम तेथेच राहून कर' असा सल्ला देत. मात्र इंदुताई चार महिने असा अनुभव घेत होत्या. अनेकांनी समजूत काढण्याचा प्रयत्न केला पण इंदुताईंनी निर्णय बदलला नाही. तुकाराम कोडगुले एक दिवस इंदुताईंना सांगू लागले 'अग ताई सारा क्रांतीचा सातारा जिल्हा तुझ्याबद्दल चिंताक्रांत आहे' ब्रिटिशांची सत्ता कशी घालवायची यापेक्षा इंदुताईला इंदुलीच्या घराकडे कशी पाठवायची याचीच काळजी सर्वांना लागली आहे. ज्येष्ठ नेते दिनकरराव निकम यांची मनोवस्था काय असेल सारे जण विचार करत आहेत. यातून इंदुताईने समजून घेतले. भारतीय स्वातंत्र्य सैनिकांना ब्रिटिशांच्या अधी देशातले देशद्रोही, गावटगे, शत्रूला बातम्या पुरवणारे, घरभेदे यांच्याशी अधिक लढावे लागणार. आयुष्यभर चळवळीत काम करायचे असेल तर खूप वाचन केले पाहिजे असे इंदुताई ठरवले. सातारा तर सोडावा लागणार होता. अशावेळी इंदुताईने आपला विचार पांडू मास्तरांच्या पत्नी गिताबाई पाटील आणि कुंडलच्या गुणाबाई कोष्टी यांना सांगितला व त्यांना विचार पटला. तिघीही सासवड आश्रम गाठण्यासाठी सातारा जिल्हा सोडला.

**पुण्यातील सासवड आश्रम ते मुंबई-**

सासवडच्या आश्रमाचा आणि पुण्यातल्या डॉ. लागूचा पत्ता घेऊन साताराच्या प्रतिसरकार मधल्या या तीन कार्यकर्त्या पुण्याकडे निघाल्या. इंदुताईच्या भाषेत या तिघी म्हणजे 'आंधळ्या पांगळ्या मोट'अशी ही मोट डॉ. लागूंच्या घरी पोहोचली. यानंतर एका क्रांतिकारकाने सासवड आश्रमात तिघींना सोडले. आश्रमात प्रेमाताई कंटकांनी स्वागत केले. सातवी पास झालेली

तरुणी, दोन पूर्णवेळ कार्यकर्त्या स्त्रियांना घेऊन आली, स्वातंत्र्यसैनिक बापाचे घर सोडून आलेली असे इंदुताईंचे प्रेमाताईंना विशेष कौतुक वाटत होते. देश, चळवळ, समाज, राष्ट्रीय प्रश्न, महात्मा गांधीजींची एकादश व्रते, विनोबांचा साम्ययोग अशा विषयावर प्रेमाताई प्रबोधन करत. खान अब्दुल गफार खान, आचार्य जावडेकर, शंकरराव देव, आचार्य स. ज. भागवत अशा विचारवंत नेत्यांचा इंदुताईला सहवास लाभला. प्रेमाताईना इंदुताई आश्रम सोडून जाऊ नये असेच वाटत होते. परंतु या तिघींनाही आश्रमाचा निरोप घेऊन मुंबईला रवाना झाल्या.

इंदुताईंच्या पायात चप्पल नव्हती. डोंगरदऱ्यातून बिन चप्पलीच्या फिरायच्या. मुंबईत चप्पल घ्यायचे इंदुताईने ठरवले. मुंबईमध्ये अनेक प्रतिसरकारचे कार्यकर्ते भेटले. मुंबईत पोलीस अगदी चतुर. सातारचे सुमारे पाचशे कार्यकर्ते मुंबईत सुखरूप होते. मुंबईमध्ये सातारा जिल्ह्यातल्या कामगारांनी 'सातारा जिल्हा राष्ट्रीय कामगार संघाची' स्थापना केली होती. कॉ. बापूराव जगताप, बाळकृष्ण रावजी मोहिते अशा कामगार नेत्यांनी स्वातंत्र्य सैनिकांचा मुंबईत निवास, प्रवास, भोजन अशा सर्व गोष्टींची व्यवस्था फार चांगली केली होती. सगळी एकमेकांना ताई, दादा, अण्णा अशा टोपण नावाने बोलवायचे. श्रमपरिहार, मनोरंजन, अभ्यास चांगला होत असे. कार्यकर्ते दुप्पट जोमाने मानसिक बळ घेवुन आपापल्या भागात कामाला परत जायचे. पांडू मास्तर, किसनवीर, पांडुरंग बोराटे, शेख काका, बाबूजी पाटणकर, इंदुताई निकम अशा कार्यकर्त्यांचा एक गट मुंबईत एकत्र होता. या मंडळींच्या अनेक विषयावर चर्चा व अभ्यासू बोलणे व्हायचे. काही वेळा निर्णयही घेत असे.

**जीवनसाथीची निवड-**

मुंबईतले वास्तव हे इंदुताईंचे विचारविश्व आणि भावविश्व आकार घेत होते. एकूण पुरुष वर्गा विषयीची त्यांच्या मनातली कटूता हळूहळू कमी होत होती. इंदुताईंचे मत बदलण्याचे मुख्य कारण पांडुरंग तात्या बोराटे आणि बाबूजी पाटणकर यांनी इंदुताईना दिलेली सन्मानाची बरोबरीची वागणूक हे कारण होते. थोड्या दिवसात या तिघांची गट्टी जमली. चर्चेत, प्रवासात, निवासात हे तिघे एकत्र राहू लागले. मते मांडू लागले. बाबूजी पाटणकर यांचे व्यक्तिमत्व विचार आणि पद्धती, त्यांचा उमेदपणा, सरळ विषयाला भिडून, स्पष्ट निर्णय घेण्याची आणि सारे स्वच्छपणे सांगण्याची प्रवृत्ती याची आपल्या मनावर भुरळ पडते आहे याची जाणीव इंदूताईंना झाली. इंदुताई एकट्या शांतपणे विचार करून बाबूजी पाटणकर यांना जीवनसाथी म्हणून निवडले. इकडे बाबूजी पाटणकरांनाही इंदुताई सारखी जीवनसखी हवी होती. घारापुरी लेणी बघायला जी. डी. बापू लाड, विजया लाड, उत्तमराव पाटील, लीला पाटील, पांडू मास्तर, गीता पाटील, पांडुरंग बोराटे, बाबूजी पाटणकर, इंदुताई निकम अशी मंडळी सहलीला गेली. इथेच सहप्रवासात इंदुताईंनी व बाबूजींनी सहजीवनाचे अभिवचन घेतले. इंदुताईंच्या या विवाहाला बरीच माणसे विरोध करत होती. पण लोकांना न जुमानता १ जून १९४६ रोजी आम्ही विवाहबद्ध होणार आहोत असे जाहीर केले. व त्यांनी ठरवले 'आपण विवाह करायचा पण देशाला स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय करायचं नाही'. १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. आणि डिसेंबर १९४७ रोजी कोल्हापूरमध्ये वैदिक पद्धतीने विवाह केला. प्रदीर्घ काळाचा ताणतणाव संघर्ष करून अखेर कुमारी इंदुमती निकम सौभाग्यवती इंदुताई पाटणकर झाल्या.

**इंदुताईचे विवाहा नंतरचे आयुष्य-**

बाबूजींची परिस्थिती हालाखीची होती. आजीने आजोळी बाबूजींना आणून सांभाळ केला. बाबूजींनी शिक्षण घेतले व चळवळीत सामील झाले. सातारा प्रतिसरकारचे तरुण कार्यकर्ते म्हणून काम करत होते. जी. डी. बापू लाड, नागनाथ अण्णा नायकवडी, बाबूजी पाटणकर, शेख काका यांचे वर्णन करतात त्या काळातले दरोडेखोर ज्येष्ठ कार्यकर्ते 'प्रतिसरकारच्या दुनाळ बंदुका' अशा शब्दात त्यांचे वर्णन करायचे. बाबूजींना मामांनी किराणा भुसार मालाचे दुकान टाकून दिले. कुठेतरी परिस्थिती चांगली होऊ लागली. दुसऱ्याची शेती वाटणे करू लागले होते. कासेगावात अनेक संघटना व सुधारणा बाबूजींनी केल्या होत्या. पुढे इंदुताईंच्या व बाबूजींना एक पुत्र झाला. त्याचे नाव भारत ठेवले. वर्षभरातच बाळ दगावले. पुन्हा दुसऱ्यांदा इंदुताईंना मूल झाले त्याचे नाव पुन्हा भारतच ठेवले. बाबूजी पाटणकर क्रांतीची अग्नी फुले फुलविणाऱ्या जीवन वेली भोवती १९४३ सालापासून घिरट्या होत्या. त्यांना हुतात्मा बनवायला ब्रिटिश आसुसलेले होते. अनेक वेळा चळवळीत मृत्यू देहाला स्पर्श करून गेला होता. अशा क्रांतिवीरांचा विश्वासघाताची अवसान घाताची फसवणूक करून २४ जानेवारी १९५२ रोजी बाबूजींच्या सतशिल, पुरोगामी,

विद्रोही, मानवमुक्तीचे स्वप्न पाहणाऱ्याचा बळी घेतला. पुन्हा इंदुताईंवर दुःखाची कुऱ्हाड कोसळली. यावेळी डी.जी. देशपांडे आबांनी या कुटुंबाचे पालकत्व स्वीकारले. पुढे इंदुताईंनी बाबूजींचे समाजक्रांतीचे अपुरे स्वप्न आपल्या खांद्यावर घेऊन वज्र ध्येयाने दमदार पावले टाकू लागल्या. १९५२ ला शिक्षिकेची नोकरी धरली होतीच पण बाबूजींचा विरोध होता. पुढे बाबूजींनी मान्यताही दिली. बाबूजींच्या माघारी ताईंवर संकटाचे पहाड कोसळले. जमिनी साऱ्या इतरांच्या होत्या. खंडाच्या आणि वाटायच्या होत्या. एका शेतमालकाने शेत काढून घेण्यासाठी भांडणे सुरू केली. बाबूजींच्या वृद्ध आईला ढकलून दिले. ती केस इंदुताईंनी जिंकून दाखविले. बाबूजींचे निवडणुकीचे कर्ज वाढले होते. इंदुताईंना शेतात जाऊन राबावे लागले. इंदुताईने पगार आणि शेतीच्या उत्पादनातून कर्ज फेडले. १९५२-५३ साली इंदुताई मॅट्रिकला बसल्या. हिंदीच्या कोविंद आणि प्रवीण च्या परीक्षा पास झाल्या. १९५७ ते १९५९ या काळात पुण्यात ट्रेनिंग कॉलेजमधून इंदुताई सिनियर ट्रेड झाल्या.

माहेरची परिस्थिती नेटाने उभारण्यास इंदुताईंचे योगदान मोठे होते. भाऊ संभाजी निकम यांचा इंदोलीतला संसार नेटका उभा राहणे ही एक गरज होती. सुरुवातीचे भांडणाचे, रुसण्या-फुगण्याचे दिवस संपल्यानंतर इंदोलीच्या घराची शिस्त लावण्याची जबाबदारी इंदुताई वर पडली. भावाच्या पत्नी उषाताई निकम काही कारणामुळे माहेरी तडसरलाच राहत असत. इंदुताईंनी उषाताईंना कासेगावला आणले. संसाराची गोडी व शिस्त लावली. प्रदीप, जयंत, प्रशांत या भावांची मुले वाढविणे, शिक्षण देणे, लग्न करणे यात इंदुताईंचा पुढाकार होता. दोन्हीकडची घरे, शेती चांगली चालावी, उत्पादन वाढावे याची शिस्त लावली. अशावेळी इंदुताईंना स्तनाचा कॅन्सर झाल्याचे डॉक्टरांनी निदान केले व इंदूताईचे ऑपरेशन केले. यातुन इंदुताई सुखरूप बाहेर पडल्या.

**१९७२ चा दुष्काळ-**

इ.स. १९७२ चा दुष्काळाने कहर केला. चळवळी उग्र बनू लागल्या. इस्लामपूर पोलिसांनी गोळीबार केला. भाई एन.डी. पाटील यांचा पुतण्या, भाई रंगराव पाटील यांचा मुलगा असे तरुण कार्यकर्ते हुतात्मे झाले. पुढे आणीबाणी जाहीर झाली. भारत भूमिगत झाला. कित्येक वर्ष त्याचे पत्रही येईना, भारत नेमका कुठे आहे? कसा आहे? आणि आणीबाणीतल्या कार्यकर्त्यांच्या छळाच्या बातम्या येत होत्या. इंदुताई हादरल्या स्वतःच्या जीवाची परवा न करता भारतला शोधू लागल्या.

**इंदुताईंचे सातारा परिसरातील कार्य-**

इंदुताई साताऱ्याला स्थायिक झाल्या. यावेळी या परिसरातील जबरदस्त 'स्त्रीमुक्ती संघटना' बांधली. इंदुताईंनी कितीतरी मेळावे, परिषदा घेतल्या. स्त्रियांची अभ्यास शिबिरे संघटित केली. परीत्यक्त्या स्त्रियांचे लढाऊ संघटन उभे केले. हुंडाबळी, तलाक, पीडित बलात्कार, पीडित स्त्रिया, घटस्फोटीत यांचे प्रश्न शासन दरबारी मांडले. आई-वडिलांच्या, नवऱ्याच्या मिळकतीत स्त्रियांचा वाटा मिळाला पाहिजे. सातबाराला इस्टेटीत स्त्रीचे नाव कायदेशीरपणे लागले पाहिजे. निराधार स्त्रियांना प्लॉट मिळाले पाहिजे. घरे बांधायला मदत मिळाली पाहिजे. स्वतंत्र रेशन कार्ड मिळाले पाहिजे. यासाठी इंदुताईंनी आग्रही लढे उभे केले. समाजकारण, राजकारण, सहकार, शिक्षण क्षेत्रात स्त्रियांना सन्मानाची वागणूक मिळाली पाहिजे. स्त्रियांना योग्य प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे. नोकरीच्या, कामाच्या ठिकाणी आणि कुटुंबात, समाजात देखील स्त्रियांची पिळवणूक होता कामा नये. यासाठी इंदुताईने प्रयत्न केले. अंगात येणे, बिबव्याच्या फुल्या पडणे, भूत बाधा होणे, भीतीदायक स्वप्न पडणे अशा मानसिक आजाराने पछाडलेल्या स्त्रियांना योग्य वैद्यकीय मदत मिळाली पाहिजे याचा इंदुताईं प्रयत्न करत असत. मांत्रिक, गंडेदोरेवाले, बुवा, भविष्य सांगणारे, कर्मकांड करणारे लोक इंदुताईचे नाव ऐकले तरी घाबरत असत. कासेगाव मध्ये एक बालवाडी दीर्घकाळ चालवली विनाअनुदान सामाजिक मदतीवर चालवली होती.

**निष्कर्ष-**

तरुण वयात मायेचे सर्व पास जुगारून स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेतली. इंदुताईंनी स्वातंत्र्याच्या चळवळीत पुरुषांच्या बरोबरीने महिलांची पथके उभे केली. शेतकरी परिषद, सेवादल प्रशिक्षण, बौद्धिक शिबिरांना त्या हजर राहत असत. गावोगावी मुलींची सेवा दल शाखा सुरू करण्यात त्यांचा पुढाकार होता. १९४२ चे 'चले जाव आंदोलन' सगळीकडे धगधगत होते. यावेळी माधवराव जाधव यांनी इंदुलीत जाऊन इंदुताईंच्या हातात बुलेटीन पुंडके ठेवले आणि ते वाटून टाका असे सांगून निघून गेले. स्वातंत्र्यलढा

सुरू झाला तरी इंदुताईनी सेवादल शाखा चालू ठेवल्या होत्या. भूमिगत राहून चळवळीचे कार्य करू लागल्या. इंदुताईनी वाळवा तालुका हे कार्यक्षेत्र निवडले. स्वातंत्र्यानंतरच्या काळात काँग्रेस समाजवादी पक्षानतर डाव्या समाजवादी पक्ष असा प्रवास करीत शेवटी कम्युनिस्ट विचारसरणी इंदुताईंनी अंगीकारली. शोषणमुक्त समाज निर्मितीचे ध्येय डोळयासमोर ठेवून दुष्काळ निवारण, धरणग्रस्तांचे पुनर्वसन अशा विविध समस्या वर होणाऱ्या अन्यायावर इंदुताई सतत कार्य मग्न राहिल्या. इंदुताई सातारा परिसर तर हादरवले. मात्र सर्व महाराष्ट्र ही इंदुताईनीच्या कामाची दखल घेतली. स्वातंत्र्यवीरांगणा यांच्या आयुष्याचे अनेक टप्पे पडतात. ९ ऑगस्ट १९४२ ते १५ ऑगस्ट १९४७ हा स्वातंत्र्य लढ्यातील काळ होता. १५ ऑगस्ट १९४७ ते २४ जानेवारी १९५२ हा बाबूजींच्या बरोबरीच्या सहजीवनाचा काळ होता. २६ जानेवारी १९५२ ते १ मे १९५७ हा हरवलेल्या बाबूजींच्या मानसिक शोधाचा आणि एकाकी पायावर उभे राहणारा इंदुताईच्या उभारणीचा काळ होता. आणि १९७२ ते १९८२ हा हातातून सुटत चाललेल्या भारताला एक कार्यकर्ता म्हणून सांगली जिल्हा परिसर परत आणण्याचा काळ होता. हे इंदूताईच्या जीवनातले महत्त्वाचे टप्पे आहेत. या टप्प्यामधून इंदुताईचे क्रांतिकारी जीवन उत्क्रांत होत गेल्या.

स्त्रीला खऱ्या अर्थाने आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करायचा असेल आणि सशस्त्र क्रांतिकारी देशभक्त म्हणून काम करायचे असेल तर प्रथम स्वावलंबी बनले पाहिजे हे सूत्र त्यांनी जाणले होते. आजन्म ब्रह्मचारी राहून कार्य करण्याची शपथ घेतली. पण फार काळ न राहता चळवळीतील बाबूजींशी विवाह केला. इंदुताईचे घर हे सामाजिक परिवर्तनाचे केंद्र म्हणून चालू राहिले. हक्कासाठी लढा देणाऱ्या हाडाच्या इंदुताई कार्यकर्त्या होत्या. इंदुताई उत्तम कवियत्री होत्या. त्या आपल्या जवळच्या माणसांना खास करून आपल्या मुलांला जेवणाच्या डब्यातून कविता लिहून पाठवत असे. अखंड आयुष्य समाज कार्यासाठी वाहून दिले. धाडसी, बिनधास्तपणा हा इंदुताईच्या स्वभावाचा गुण. तत्कालीन परिस्थिती पाहता स्त्रियांनी घराबाहेर न पडण्याचा काळ होता. मात्र इंदुताईने स्वतःचे घर सोडून स्वातंत्र्यासाठी धडपडत होत्या. समाजातील माणसाच्या मानसिकतेचा विचार न करता. एखाद्या पुरुषाला ही लाजवेल अशी कामगिरी इंदुताईनी केली होती. इंदुताई प्रचंड अभ्यासु व जिद्दी होत्या. आयुष्यात स्वतःसाठी खूप सुंदर जगता आले असते. मुलाला डॉक्टर करून ऐशोआरामा मध्ये जीवन घालवू शकल्या असत्या. मात्र अखंड आयुष्य समाज सेवेसाठी त्यांनी घालवलं. समाज जागृतीसाठी आक्रमण अखेरच्या श्वासापर्यंत धडपडणाऱ्या या क्रांतीवीरांगणेचे २४ जुलै २०१७ रोजी निधन झाले.अशा क्रांतिकारी इंदुताईना 'लाल सलाम'

**संदर्भ ग्रंथ -**

१) सत्यवादी वृत्तपत्र- कोल्हापूर, इ. स.१९४७ पा. नं. -४

२) भारत पाटणकर, क्रांतीवीरांगना इंदुताई पाटणकर, लोकवाङमय गृह,मुंबई, २०१७

३) मुलाखत- भारत पाटणकर

४) पुढारी वृत्तपत्र, सागली, २१ ऑगस्ट २०२३, पान. न. ४

५) डॉ. बाबुराव गुरव, क्रांतिवीर इंदुताई पाटणकर, निर्मती विचारमंच, कोल्हापूर, ११ एप्रिल २००९

६) सं. श्याम येडेकर, भारतीय स्वातंत्र्य लढयातील स्त्रियांचे योगदान, राजहंस प्रांटिंग प्रेस, कोल्हापूर 2007

७) सं. शोभा चाळके,भारतीय स्त्रियांचे स्वातंत्र्य, निर्मिती विचार मंच, कोल्हापूर, २०१०